सुविचार
चांगले विचार करा आणि चांगले जीवन जगा

# दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com

■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 155 ■ बुधवार ,दि. 16 जुलै 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रु 5



**पावसाची महिनाभरापासून दडी; खरीप पिके संकटात**
पेज ४

# ४० दिवसांत ३३० गायींची सुटका, २५ वाहनांसह दीड कोटींचा मुद्देमाल जप्त

## गोवंशीय जनावरांच्या अवैध वाहतुकीविरोधात धाराशिव पोलिसांचे ऑपरेशन

**आरंभ मराठी SPECIAL**

सज्जन यादव | आरंभ मराठी

धाराशिव: गोवंशीय जनावरांच्या अवैध वाहतुकीविरोधात धाराशिव पोलिसांनी पोलीस अधीक्षक रितू खोखर यांच्या नेतृत्वाखाली विशेष ऑपरेशन सुरू केले असून, मागील दीड महिन्यात पोलिसांनी याप्रकरणी मोठ्या संख्येने कारवाया केल्या आहेत. गोवंशीय जनावरांची अवैध वाहतूक, गोमांसाची वाहतूक आणि जनावरांच्या चामड्याची वाहतूक करणाऱ्या टोळीवर पोलिसांचे बारीक लक्ष असून, मागील ४० दिवसात २० हून अधिक गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलिसांनी दीड महिन्यात कत्तलीसाठी वाहतूक होणाऱ्या तब्बल ३३० गाईंची सुटका केली आहे.पोलीस अधीक्षक रितू खोखर यांनी मागील दीड महिन्यापासून गोवंशीय जनावरांच्या अवैध वाहतुकीवर निर्बंध आणण्यासाठी धाराशिव जिल्ह्यात विशेष मोहीम राबविण्यास सुरुवात केली आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या मदतीने जिल्ह्यात गाईंच्या अवैध वाहतुकीवर दररोज वेगवेगळ्या भागात मोठ्या प्रमाणात कारवाया करण्यात येत आहेत. गोवंशीय जनावरांची वाहतूक, गोमांसाची वाहतूक आणि जनावरांच्या चमड्याची वाहतूक करणाऱ्या विरोधात मागील ४० दिवसात ३० पेक्षा अधिक आरोपींवर २० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. एव्हढ्या मोठ्या प्रमाणात कारवाया होत असतानाही जिल्ह्यात दररोज कुठे न कुठे गाईंची वाहतूक होतच असल्याचे दिसते. पोलिसांनी केलेल्या कारवाईत तब्बल ३३० गाईंची सुटका केली आहे. तसेच तीन कारवाईत ७.५ टन गोमांस जप्त केले आहे. तसेच २५ गोवंशीय जनावरांचे चामडे देखील जप्त करण्यात आले आहे. पोलिसांच्या या कारवाईत तब्बल १ कोटी ५८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच २५ पेक्षा अधिक वाहने जप्त करण्यात आली आहेत. पोलिसांनी कारवाईचा धडाका लावला असला तरीदेखील अजूनही यावर आळा बसला नसून, दररोज कुठे न कुठे जनावरांची अवैध वाहतूक सुरूच असल्याचे दिसून येते.



### परंडा आणि धाराशिव हॉटस्पॉट

पोलिसांनी केलेल्या कारवाईत सर्वाधिक कारवाया परंडा आणि धाराशिव शहरात केल्या आहेत. गोवंशीय जनावरांच्या अवैध वाहतुकीत परंडा तालुक्यात सर्वाधिक गुन्हे घडतात. तर धाराशिव शहर आणि तालुक्यात गोमांस आणि चामड्याची अवैध वाहतूक मोठ्या प्रमाणात होते. मागील चाळीस दिवसात परंडा पोलीस ठाण्यात ५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यामध्ये ८२ गाईंची सुटका केली तर १५०० किलो गोमांस जप्त केले आहे. तर धाराशिव तालुक्यात ६ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यामध्ये १४२ गाईंची सुटका केली तर ६ टन गोमांस आणि २५ जनावरांचे चामडे जप्त करण्यात आले आहे.

### मागील ४० दिवसात झालेली कारवाई

**२२ –गुन्हे दाखल,**
**३३० –जनावरांची सुटका,**
**२६ –वाहने जप्त,**
**७५०० किलो–गोमांस जप्त,**
**२५ –जनावरांचे चामडे जप्त,**
**१ कोटी ५७ लाख ८४ हजार रुपयांचा एकूण मुद्देमाल जप्त**

## अल्पवयीन मुलीवर बलात्कार करून जमावाची मारहाण



आरंभ मराठी | आंबी

सतरा वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करून जमावाने तिला बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना भूम तालुक्यातील एका गावात घडली. यावेळी मुलीची आई मदतीला आली असता तिलाही जमावाने मारहाण केली. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, भूम तालुक्यातील एका गावातील १७ वर्षीय मुलगी (नाव– गावगोपनीय) ही दिनांक १७ जुलै रोजी रात्री एक वाजता घरा समोरील अंगणात झोपली होती. त्यावेळी गावातील चार ते पाच तरुण त्याठिकाणी आले आणि तिला घरापासून काही अंतरावर घेवून गेले. त्यातील एका तरुणाने मुलीच्या गळ्याला चाकू लावून तिच्यावर बळजबरीने लैंगीक अत्याचार केला. तसेच इतर तरुण तिला लाथाबुक्यांनी मारहाण करत असताना तिने आरडा ओरड केली. मुलीचा आवाज ऐकून तिची आई तिला वाचवण्यासाठी आली. त्यावेळी आईलाही तरुणांनी मारहाण करुन जखमी केले. पिडीत तरुणीने दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या.सं.कलम– ६४, ११५(२), १९१(२) (३),१९० सह कलम ४, ८, १२ पोक्सो अन्वये गुन्हा नोंदवला आहे.याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

## जिल्ह्यातील युवकांनी शासनाच्या रोजगार व कौशल्य विकास योजनांचा लाभ घ्यावा

**भाजपा जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांचे आवाहन**

आरंभ मराठी | धाराशिव

जागतिक युवक कौशल्य दिनाच्या निमित्ताने धाराशिव जिल्ह्यातील युवकांसाठी अनेक आशादायक संधी निर्माण होत असून, शासनाच्या रोजगार व कौशल्य विकास योजनांचा जिल्ह्यातील तरुणांनी मोठ्या प्रमाणावर लाभ घेण्याचे आवाहन भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी केले. महायुती सरकारने घेतलेल्या रोजगाराभिमुख निर्णयांमुळे जिल्ह्यातील हजारो युवकांसाठी नोकरी व उद्योजकतेची दारे उघडली गेली आहेत. विशेषतः आयटीआय संस्था, कौशल्य विकास केंद्रे व सहकार प्रकल्पांच्या माध्यमातून प्रशिक्षण घेत असलेल्या युवकांना स्वतःचे उद्यम सुरू करण्यास मदत होत आहे असे कुलकर्णी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे सांगितले. युवकांनी केवळ शासकीय नोकरीकडे पाहू नये, तर स्वतः चा व्यवसाय, स्टार्टअप्स याकडे वळावे. जिल्ह्यातील कृषी प्रक्रिया उद्योग, महिला उद्योजकांसाठीच्या योजना, मुद्रा व स्टँड अप योजनेच्या माध्यमातून अनेक तरुणांनी स्वतः चा व्यवसाय यशस्वीरीत्या उभा केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि रोजगार व कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या नेतृत्वाखाली रोजगार निर्मितीसाठी अनेक प्रभावी योजना राबवल्या जात आहेत. या योजनांचा लाभ ग्रामीण भागातील युवकांपर्यंत पोहोचवण्यात आमदार राणाजगजितसिंह पाटील आणि माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यांनी सातत्याने पाठपुरावा करून विविध प्रशिक्षण केंद्रे आणि उद्योगविकास प्रकल्प धाराशिव जिल्ह्यात आणले आहेत. त्याचाही लाभ जिल्ह्यातील तरुणांना होत असल्याचे कुलकर्णी यांनी म्हंटले आहे.

## कळंब–लातूर रोडवरील पुलांवर अखेर सूचना फलक व रेडीयम बसले,अपघातांवर नियंत्रण शक्य

आरंभ मराठी | शिराढोण

**आरंभ मराठी IMPACT**




कळंब – लातूर रोड वरील शंभरावर पुलांचे काम रखडले, धोकादायक पुलांमुळे आघातांचे प्रमाण वाढले, सुचना फलकही नसल्यामुळे आठवडयाला होत आहेत मोठे अपघात' या मथळया खाली दै. आरंभ मराठीने यासंदर्भात वृत्त प्रकाशीत करुन संबंधीत विभागाचे लक्ष वेधले होते. या वृत्ताची दखल घेत या महिन्यामध्ये कळंब–लातूर रोड वरील पुलांवर सुचना फलक तसेच मोठया प्रमाणात रात्री स्पष्ट दिसेल असे रेडीयमचे पोल उभे केले आहेत. यामुळे निश्चीतच पुलांचे काम होईपर्यंत अपघातांना आळा बसणार आहे.

कळंब लातूर रोडचे काम पुर्ण होवून एक ते दिड वर्ष झाले आहे. रस्ता चांगला झाल्याने या रस्त्यावरुन मोठया संख्येने वाहनांची वर्दळ वाढली आहे. कळंब ते लातूर या मार्गावर शंभरावर छोटे मोठे पुल आहेत. रस्त्याचे काम तर पुर्ण झाले, परंतू या पुलांचे



दैनिक आरंभ मराठी
07 Nov 2024 - Page 1
epaper.arambhmarathi.com

**कळंब– लातूर रोड वरील शंभरपेक्षा अधिक पुलांचे काम रखडले**

धोकादायक पुलांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले – सूचना फलकही नसल्यामुळे आठवड्याला होत आहेत मोठे अपघात

अमोलसिंह चंदेल । आरंभ मराठी

शिराढोण : कळंब ते लातूर रोड म्हणजे कायम वर्दळीचा मार्ग. या रोडचे काम पुर्ण होवून सात ते आठ महिन्यांचा कालावधी झाला आहे. परंतु, या रोडवरील शंभराच्या घरात असणाऱ्या छोट्या मोठ्या पूलांचे काम मात्र अद्याप पर्यंत झाले नसल्याने या पुलांमुळे अनेकांना आपला जीव गमवावा लागल्याच्या घटनाही घडत आहेत. [illegible]

रस्त्यावर कोणत्याही प्रकारचे सुचना फलक नाहीत

किमान सूचना फलक तरी लावावे

–रामेश्वर मुंदडा, व्यापारी, शिराढोण.

काम मात्र अर्धवट आहे. या पूलांची खोली जास्त असल्याने अनेकांना हे पुल रात्रीच्या वेळी लक्षात न आल्याने आपला जीव गमवावा लागल्याच्या घटना घडल्या आहेत. या बाबत दै. आरंभ मराठीने वृत्त प्रकाशीत करुन लक्ष वेधले होते. त्यानंतर आता या पुलांवर पुढे पुल असल्याचे सुचना फलक तसेच पुलाच्या दोन्ही बाजूंनी रेडीयम लावून पोल लावण्यात आले आहे. सध्या रात्रीच्या वेळी सुचना फलक तसेच रेडीयममुळे पुढे पुल असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. त्यामूळे आपोआपच वाहन चालकांच्या वाहनांची गती कमी होवून धोका टळण्यास मदत होत आहे.

## तांब्याची तार चोरणारे दोन आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या ताब्यात

धाराशिव –तांब्याची किंमती चार चोरणाऱ्या दोन अट्टल आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने धाराशिव शहरातील बेंबळी पॉईंट येथून ताब्यात घेतले. यातील एक आरोपी अल्पवयीन असून, यावेळी आरोपींकडून ७१ हजारांचा मुद्देमाल आणि एक दुचाकी जप्त करण्यात आली. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, चोरीच्या गुन्ह्याचा छडा लावण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे एक पथक शहरात फिरत असताना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, दोन मुले बेंबळी पॉईंट येथे चोरीचे केबल जाळून त्यातील तांब्याची तार विकणार आहेत. खात्रीलायक बातमी मिळाल्यावरुन पथकाने त्या ठिकाणी जाऊन सापळा लावला. पोलिसांनी तेथून विशाल शाम जाधव (वय २० वर्षे, रा. साठे नगर, धाराशिव) यांच्यासह एका अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले.

## उमरगा येथील खुनाच्या गुन्ह्यातील आरोपी चोवीस तासात जेरबंद

आरंभ मराठी | उमरगा

उमरगा शहरातील महिलेचा गळा दाबून खून केल्याची धक्कादायक घटना रविवारी ( दि.१३) घडली होती. याप्रकरणी पोलिसांनी चोवीस तासांच्या आत आरोपीच्या मुसक्या आवळून त्याला ताब्यात घेतले. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, रविवारी दुपारी उमरगा पोलीस ठाणे येथे माहिती मिळाली की, पतंगे रोड उमरगा येथील मोमीन मस्जिद जवळ राहणारी महिला सौमाया रमेश शिंदे (वय ४५) ही राहत्या घरी बेडवर मृतावस्थेत पडलेली असुन तिच्या गळ्यावर व्रण दिसत आहेत. पोलिसांनी त्या ठिकाणी जाऊन पंचनामा केला व प्रेताचे शवविच्छेदन करण्यात आले. त्यानंतर चौकशीमध्ये आरोपीस घटनास्थळी जाताना पाहणारे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांच्याकडे विचारपुस करुन तपास केला असता, सदर महिला माया रमेश शिंदे हिला तिचाच प्रियकर माधव पांडुरंग पाचंगे (वय ४४ वर्षे, रा. हिप्परगाराव ता. उमरगा ह.मु. तुरोरी ता. उमरगा) याने अनैतिक संबंधातुन तिच्या चारीत्र्यावर संशय घेवून गमजाने गळा आवळुन खुन केला असल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणात फिर्यादी रोहिणी दिपक पाटोळे (वय २४ वर्षे) यांनी फिर्यादी दिली होती. या गुन्ह्याच्या तपासात तांत्रिक मदत घेऊन आरोपीला पुणे येथून अटक करण्यात आली. आरोपीला मंगळवारी (दि.१५) न्यायालयासमोर हजर केले असता मा. न्यायालयांनी नमुद आरोपीस १८ जुलै पर्यंत पोलीस कोठडी सुनावली. आरोपीने महिलेच्या चारीत्र्यावर संशय घेवुन तिच्यामुळेच त्याचे कौटुंबिक जीवन बरबाद झाल्याचा राग मनात धरुन दिनांक १२ जुलै रोजी रात्री तिच्या घरी जावून गमजाने तिचा गळा आवळुन खुन केल्याचे निष्पन्न झाले. गुन्हा घडल्यानंतर चोवीस तासात आरोपीला पकडण्यात पोलिसांना यश आले. ही कामगीरी पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर व अपर पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना व उपविभागीय पोलीस अधिकारी उमरगा सदाशिव शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली उमरगा पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक अश्विनी भोसले, सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग कन्हेरे, पोउपनि गजानन पुजरवाड व त्यांच्या पथकाने केली.

## परंडा येथील सराफ व्यावसायिकाला लुटणारे तीन लुटारू अखेर जेरबंद

### स्थानिक गुन्हे शाखेची माढा येथे मोठी कारवाई

आरंभ मराठी | धाराशिव

परंडा येथील सराफ व्यावसायिकाला लुटणाऱ्या तीन जणांना अखेर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मोठ्या शिताफीने पकडले. दशरथ सुग्रीव गोरे या सराफ व्यावसायिकाला ७ जुलै रोजी सायंकाळी कुर्डुवाडी रोडवर अडवून तिघांनी लुटल्याची घटना घडली होती. आरोपींनी स्कॉर्पिओ गाडीत येऊन दशरथ गोरे यांच्या डोळ्यात मिरची पूड टाकून ५० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम ४७ हजार रुपये असा एकूण तीन लाख ९७ हजार रुपये किमतीचा माल जबरीने हिसकावून नेला होता. स्थानिक गुन्हे शाखेचे पथक आरोपींच्या मागावर होते. यातील संशयित आरोपी बारलोणी (ता. माढा जि. सोलापूर) येथे असल्याची माहिती मिळाल्यावरुन पथकाने त्या ठिकाणी जावून त्यांना ताब्यात घेतले. यावेळी संतोष विनायक गुंजाळ, (वय ४० वर्षे, रा. बारलोणी ता. माढा) याला ताब्यात घेऊन त्याची विचारपुस केली असता त्याने उडवाउडवीचे उत्तरे दिली. पोलिसी खाक्या दाखवताच त्याने सदरचा गुन्हा त्याच्यासह पाच जणांनी केल्याचे कबूल केले. त्यावर पथकाने परंडा येथील राजु सिध्दु शिंदे याच्या समता नगर झोपडपट्टी कुर्डुवाडी रोड येथील घरी जाऊन त्याला ताब्यात घेतले. त्यानेही हा गुन्हा केल्याचे कबूल केले. पोलिसांनी दोन पंचा समक्ष आरोपी संतोष विनायक गुंजाळ (वय ४० वर्षे, रा. बारलोणी ता. माढा), सर्जेराव सखाराम डिकोळे (वय ४६ वर्षे, रा. लव्हळ ता. माढा) आणि राजु सिध्दू शिंदे (वय ४० वर्षे, रा. परंडा) यांना ताब्यात घेवून त्यांच्या ताब्यातुन गुन्ह्यातील १ मोटरसायकल व सोन्याचे दागिने, रोख रक्कम २३,५०० रुपये असा एकुण १,९७,६७० रुपये किंमतीचा माल जप्त केला. आरोपींना मुद्देमालासह परंडा पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले. ही कामगीरी पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर व अपर पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली सथानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदर्शन कासार, सचिन खटके, अमोल मोरे, पोह. जानराव, वाघमारे, निंबाळकर, गादेकर, राठोड, पठाण, काझी, औताडे, ढगारे, घुगे, बोईनवाड तसेच जलद प्रतिसाद पथकाचे पोउपनि बहुरे, पथक व दंगल नियंत्रण पथकाच्या दोन्ही पथकाचे अंमलदार यांच्या पथकाने केली.



## शालेय पोषण आहारात अळ्या,तरीही कारवाई नाही

### आमदार कैलास पाटील यांनी सरकारला कोंडीत पकडले, शिक्षणमंत्री दादाजी भूसे म्हणाले, कारवाई करणार

आरंभ मराठी | धाराशिव

जिल्ह्यातील एकूण ५ शाळांमध्ये शालेय पोषण आहारात अळ्या निघण्याचा प्रकार उघडकीस आला होता. या प्रकरणात संबंधित ठेकदारावर कारवाई न झाल्याचा मुद्दा आमदार कैलास पाटील यांनी उपस्थित करत सरकारचे या विषयाकडे लक्ष वेधले. त्यानंतर शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी याप्रकरणात कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, असे प्रकार यापुढेही खपवून घेतले जाणार नाहीत. जिल्हा परिषद शाळेमध्ये विषय शिक्षक मिळावा, शालेय पोषण आहारामध्ये आळ्या आढळूनही गुत्तेदारावर कारवाई झालेली नाही, याप्रकरणात कारवाई करावी या मागण्या आमदार कैलास पाटील यांनी शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्याकडे सभागृहात केली. त्यावर मंत्री भुसे यांनी तत्काळ शिक्षक देऊन शासकीय शाळामध्ये सुविधा देण्याचा शब्द दिला. आमदार पाटील म्हणाले की, शहरातील शाळामध्ये सीसीटीव्ही बसवण्याचा विचार होतो. तसेच ग्रामीण भागात सुद्धा सीसीटीव्ही बसवणे गरजेचे आहे. मात्र, आधी शाळामध्ये शौचालयाची व्यवस्था करणे आवश्यक आहे. याशिवाय जिल्ह्यात ५४ जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळा आहेत. या शाळेमध्ये शेकडो विद्यार्थी नववी व दहावीचे शिक्षण घेतात. पण या शाळेमध्ये विषय शिक्षक दिले जात नसल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. एका बाजूला अतिरिक्त शिक्षक असताना दुसरीकडे आवश्यक ठिकाणी ते मिळत नाहीत असा विरोधाभास पाहायला मिळत आहे.



याशिवाय आमदार पाटील यांनी एका गंभीर विषयाकडे सभागृहाचे लक्ष वेधले. विद्यार्थी वर्गासाठी दिल्या जाणाऱ्या पोषण आहारात चक्क आळ्या आढळून आल्या आहेत. तरीही त्या गुत्तेदाराचे कंत्राट रद्द केलेले नाही. एका बाजूला आमदार निवास येथील कॅन्टीनमध्ये निकृष्ट जेवण दिल्यावरून एका आमदारानी तक्रार दिली तर तिथे दुसऱ्या दिवशी ती कॅन्टीन बंद करून त्याची अन्न औषध प्रशासनाकडून तपासणी होते. मात्र सामान्य विद्यार्थी यांच्या आहारात थेट आळ्या येऊनही त्याची गंभीर दखल घेतली जात नसेल तर असा भेदभाव का असाही मुद्दा आमदार पाटील यांनी उपस्थित केला. यावर उत्तर देताना मंत्री भुसे म्हणाले की, जिल्हा परिषद शाळामध्ये आवश्यकता व पटसंख्येनुसार विषय शिक्षक उपलब्ध करून दिले जातील. पोषण आहाराबाबत मी स्वतः वृत्तवाहिनीवरून हा प्रकार पाहिल्यावर अधिकारी यांना योग्य सूचना दिल्या होत्या. यापुढेही असा प्रकार खपवून घेतला जाणार नाही. जिल्हा परिषद शाळामध्ये सर्व भौतिक सुविधेसह अन्य चांगल्या सोयी निर्माण करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. एका वर्षानंतर हे चित्र बदलेल दिसेल असा शब्द मंत्री भुसे यांनी सभागृहात दिला.

# एक कोटीच्या बंगल्यात राहिल्यास मृत्यू येत नाही का?

**घर** असावे घरासारखे नकोत नुसत्या भिंती' हे सुभाषित घराचे महत्त्व सांगते. घर मानवाच्या मूलभूत गरजा पैकी एक गरज आहे. शहरात काही लोकांचे स्वतःचे हक्काचे घर असते, काहींचे गावाकडे स्वतःचे साधे घर असते. काही लोक किरायाने दुसऱ्याच्या घरी घरभाडे देऊन राहतात आणि काही लोकांकडे मोठ्या किंमतींचे हायफाय बंगले असतात. जन्मजात श्रीमंत लोकांनी फार मोठे मोठे आणि महागडे बंगले बांधले आहेत. त्यांच्या घरांच्या किंमती ऐकल्या की डोळे गरगरतात. गरीबांनी शहरात प्लॉट किंवा घर खरेदी करण्याची स्वप्ने सुध्दा बघू नयेत एवढ्या अवाढव्य किंमती मालकांनी व दलाल लोकांनी मिळून वाढवून ठेवल्या आहेत. शहरात बंगलो किंवा रो हाऊस विकत घ्यायचे असेल तर त्यांच्या किंमती एक कोटीपेक्षा कमी नाहीत. एवढ्या महागड्या घरात राहिल्यास बहुतेक मृत्यू येत नसावा, अमरत्व प्राप्त होते अशा मानसिकतेच्या लोकांनी शहरात शेत जमीन,प्लॉट व घरांच्या किंमती भरमसाठ वाढवल्या आहेत. एकेकाळी घर म्हणजे निवारा ही मानवाची मुलभूत गरज होती. साधारणपणे तीन ते चार खोल्यांचे घर असायचे तर काहींचे संसार दोन खोल्यांच्या घरात थाटलेले होते. तरीही ते लोक सुखात व आनंदात न्हाऊन निघायचे. ज्यांचे घर मोठे असायचे त्यांचे आम्हाला भारी अप्रूप वाटायचे. स्वत:चे साधे घर असणे त्याकाळी समाधानाची गोष्ट होती आणि आज कोणाचे घर उंच, अलिशान आणि महागडे आहे हे दाखवण्याची जीवघेणी स्पर्धा लागली आहे. खरेतर घर हे फक्त घरासारखे असावे,केवळ देखावा म्हणून किंवा चार चौघात वाहवा व्हावी म्हणून महागडे घर बांधून कोणतेच समाधान मिळत नाही.कारण त्या महागड्या घरात राहिल्यास फायदा काहीच होत नाही. उलट पैशाचा अपव्यय होतो, चांगले टुमदार घर बांधले म्हणून वास्तुशांतीला आलेले लोक



शाबासकी देतात, जाताना जर तर च्या गोष्टी करून घर बांधलेल्या व्यक्तीला बुचकळ्यात टाकून जातात. शेवटी लोक कशालाही नावे ठेवतात म्हणून त्यांची गोष्ट फार मनाला लावून घेऊ नये. परंतु, गरजेपुरते आपले स्वतःचे घर असले पाहिजे.तरीपण तेवढी साधी गोष्ट काही जणांना जमत नाही, आतापर्यंत मला सुद्धा जमली नाही. स्वत:चे साधे घर बांधणे सोडा, साधा रिकामा प्लॉट घेणे सुध्दा आवाक्याच्या बाहेरची गोष्टी झाली आहे. काही व्यक्ती अलिशान बंगले बांधतात पण नोकरी निमित्त दुसऱ्या शहरात जावे लागते तेव्हा आपले घर भाड्याने देऊन जातात. दुसऱ्या शहरात स्वतः मासिक भाडे तत्वावर किरायाच्या घरात राहतात. ते काहीही असो, घराच्या किंमती आकाशाला गवसणी घालत आहेत. भारत हा गरीबांचा देश आहे. इथे आजही बरेच लोक फुटपाथवर राहतात व काही लोक पालाच्या घरात राहतात. देशात दुसरीकडे हायफाय बंगले व टोलेजंग इमारती थाटात उभे आहेत. इतकी कमालीची विषमता असुनही शासन बेघरांना घर देऊ शकत नाही आणि श्रीमंत लोकांच्या घराच्या किंमती नियंत्रणात ठेवू शकत नाही. जे लोक खुल्या प्लॉटच्या व विक्रीला काढलेल्या घरांच्या किंमती मनात आले तेवढे वाढवतात त्यांच्यावर नियंत्रण ठेवले पाहिजे आता कोणी म्हणेल, ज्याची मालमत्तेवर मालकी असते तोच किंमत ठरवणार? तुम्ही कोण सांगणारे? ते खरे ही आहे. पण, किंमत कितीही वाढवणे हे संयुक्तिक नाही. मोठमोठे बंगले बांधून हायफाय सोसायटीत राहणाऱ्या लोकांचे स्वभावगुण ही फार विचित्र असतात. त्यांचे वर्तन सामान्य लोकांपेक्षा वेगळे असते, जणू अमरत्व लाभल्यासारखे. माणुसकीला व नातलगांना जपणारे हायफाय घर बांधू शकत नाहीत. ते इतरांना मदत करत असतात, गरज पडली की गरजू लोकांच्या मदतीला धावून जातात. महागड्या घरात राहणाऱ्या लोकांकडे ही वृत्ती नसते. ते केवळ आपल्या कुटुंबाला प्राधान्य देतात. इतरांना मदत करणे त्यांच्या स्वभावात नसते, तसे त्यांच्यावर संस्कार झालेले नसतात. फक्त श्रीमंत होणे, जास्तीत जास्त संपत्ती जमवणे एवढेच त्यांना माहीत असते. म्हणून अशा वृत्तीच्या लोकांनी शहरात वर्चस्व प्रस्थापित केले आहे. म्हणून जमीन, प्लॉट व घरांच्या खरेदी विक्री व्यवहारावर त्यांनी वर्चस्व मिळविले आहे. यामुळे शहरात जमिन, खुले प्लॉट यांच्या किंमती भरमसाठ वाढवल्या गेल्या आहेत. घर किंवा खुला प्लॉट घ्यायचे म्हटले की, एक कोटी रुपये मोजण्याची ऐपत असली पाहिजे. घर हे घरासारखे असावे, महागड्या हायफाय बंगल्यात राहीले काय, मध्यम आकाराच्या घरात राहिले काय आणि झोपडीत राहिले काय. मृत्यू तर चुकणार नाही ना! म्हणून लोकांनो घराच्या व खुल्या प्लॉटच्या किंमती भरमसाठ वाढवू नका. अति तिथे माती व्हायला वेळ लागत नाही हे लक्षात ठेवा. काळ आणि वेळ जुळून आले की, सगळं होत्याचे नव्हते होऊन जाते. हे वडिलधाऱ्या मंडळीच्या अनुभवाचे बोल लक्षात ठेवा.



**बबन दामोदर गुळवे**
उमरगा कोर्ट ता.अहमदपूर
जि.लातूर.
मो.९५४५४४२६४८.

# माहेरची ओढ..

**प्रत्येक** विवाहित महिलेला आपल्या माहेरची ओढ असते आणि ही ओढ असणे साहजिकच आहे. जन्मल्यापासून वयाची वीस – बावीस वर्षे म्हणजे विवाह होईपर्यंत आपल्या जन्मदात्या आई वडिलांसोबतचा, भावंडासोबतचा काळ जिथे घालवला त्या कुटुंबाला,त्या घराला सोडून कायमसाठी दुसऱ्या घरी आल्यानंतर आपल्या अगोदरच्या घराची म्हणजेच माहेरची आठवण येणे स्वाभाविकच आहे नाही का. माहेरची ही आठवण, ही ओढ प्रत्येक विवाहितेला लागून राहिलेली असते.पुढे चालून घर–दार, संसार, लहान–लहान लेकरं या साऱ्या धावपळीत माहेरच्या आठवणींना थोडेसे बाजूला ठेवावे लागते.एकूणच काय तर प्रत्येक विवाहितेच्या मनात आपल्या माहेरबद्दल एक कोपरा असतो.म्हणूनच की काय माहेरच्या गावातील एखाद्या मंदिराच्या जिर्णो द्धाराचे काम असेल तर त्या बांधकामाला येणारा खर्च सर्व ग्राम स्थ मिळून करतात.मात्र मंदिराच्या कळसासाठी येणाऱ्या खर्चासाठी मात्र गावातून लग्न होऊन गेलेल्या विवाहीतांना आवाहन केले जाते आणि त्याही याकामी आपले यथाशक्ती योगदान देत असतात.माहेरवाशिणीला माहेर कोणते असे विचारले असता प्रथम ती आपल्या गावाचे नाव सांगते नंतर घराचे नाव सांगते.म्हणजेच माहेरबद्दल असलेली ही ओढ केवळ कुटुंबापुरती मर्यादित नसते तर तिची व्याप्ती गावापर्यंत असते.ग्रामिण भागात एक म्हण प्रचलित आहे, ' माहेरचं कुत्रंही प्रिय असते.'म्हणूनच माहेरचे ऋणानुबंध आणखी घट्ट व्हावे यासाठी काही उपक्रम हाती घेता येतील.माहेरवाशिणीने प्रत्येकवर्षी एक फळझाड आपल्या माहेरच्या शेतात,घरी जेथे कोठे जागा असेल तेथे लावावे. ज्या झाडाला पुढील




चार–पाच वर्षात फळ येईल.एखाद्या घरी दोन–तीन माहेरवाशिणी असतील तर त्यापैकी काहींनी आपल्या चूलत भावाच्या शेतात झाड लावावे.समजा सख्ख्या भावात आणि चूलत भावात काही कारणांने भांडणे, मतभेद,गैरसमज झालेले असतील तर ते आपल्या या कृतीने नाहीसे होण्यास मदत होईल.आणि आपली माहेर ही संकल्पना आपल्या कृतीने अधिक व्यापक होईल.तसेच आपण शिकलेल्या शाळेतील गरजू आणि गरीब विद्यार्थीनींना शैक्षणिक साहित्यासाठी आर्थिक मदत करण्यासाठी आपण आपल्या क्षमतेनूसार आर्थिक मदत मुख्याध्यापकांकडे सुपूर्द करता येईल.त्या पैशातून मुख्याध्यापक, शिक्षक गरजू विद्यार्थ्यांनींना शैक्षणिक साहित्यासाठी आर्थिक मदत करतील. हे करत असताना सरसकट सर्वच विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप असे स्वरूप येऊ नये.जे गरजू आहेत त्यांनाच ज्यास्तित ज्यास्त प्रमाणात मदत मिळेल असा प्रयत्न असावा.त्याचप्रमाणे माहेरवाशिणीला आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने आपल्या माहेरातील शाळेस एक पुस्तक भेट देता येईल . जेणेकरून आपण शिकलेल्या शाळेतील ग्रंथालय सुसज्ज होईल.मुलांना अवांतर वाचण्यासाठी मोठ्या प्रमाणात पुस्तके उपलब्ध होतील आणि वाचन संस्कृती अधिक वाढत जाईल. तर मग मैत्रीणीनो आपल्या असलेल्या माहेरच्या ओढीला अशा या उपक्रमाची जोड दिली तर मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड होईल , मुलींच्या शिक्षणासाठी आपल्या परीने मदत होईल.यातूनच महिला सबलीकरण, महिला सक्षमीकरण होण्याला मदत होईल.वाचन संस्कृती वाढण्यास मदत होईल.अशा प्रकारे उपक्रम आपणांस हाती घेता येईल.यासाठी काही ठोस कालमर्यादा नाही.तरीही पावसाळ्यात लावलेली झाडे चांगली चिटकतील. शिवाय सध्या शाळा–महाविद्यालय सुरू झालेली आहेत.याचकाळात शैक्षणिक साहित्यासाठी केलेली मदत अधिक संयुक्तिक ठरेल.आणि हो हा उपक्रम केवळ आपण आपल्यापुरताच मर्यादित न ठेवता यात आपल्या परिचयातील माहेरवाशिणींना सहभागी करून घेऊन ही साखळी वाढवू यात. आणी ही.माहेरची ओढ अधिक अर्थपूर्ण करूयात.



**श्रीम.सरिता सुधाकर उपासे**
९४०३६६१३७०

# सुविचारांचा जागर करणारे आत्मचरित्र 'जागरण'

**लेखक,** कविवर्य, वात्रटिकाकार श्री. भारत सातपुते यांचे 'जागरण' हे आत्मचरित्र वाचनात आले. पुस्तकाचे मुखपृष्ठ अत्यंत आकर्षक आणि बोलके आहे. आत्मचरित्राचा नायक म्हणजे स्वत: लेखक. त्याच्या जीवनातील बहुतांश काळ यात शब्दबद्ध केला जातो. कुठल्याही आत्मचरित्राची सुरूवात लेखकाच्या बालपणापासून होते. लेखकाचा अतीशय सामान्य कुटुंबात झालेला जन्म, हालाखीत गेलेले बालपण आणि शिक्षणासाठी केलेला संघर्ष पुस्तकाच्या पूर्वार्धात आहे. रस्त्यावर ओरडत चालले तर ''ते खायला घे'' म्हणून आईजवळ रडत बसायचे. आईकडे कुठले पैसे ? केसावर बंबई मिठाई मिळायची. आईने विंचरून न्हाणीच्या तुराट्यांनी खचून ठेवलेले केस त्याला देऊन आमचे लाड पुरवायचे. दोन चार दिवसाला पुन्हा तो आला की पुन्हा आईजवळ हट्ट धरायचा, तवा आई चिडून म्हणायची, ''आता कुठून घेऊ, मेले केसही जास्त गळत नाहीत ?'' 'कान तुटलेली काटवट अन एका बाजुला पळी व दुस–या बाजूला उलथने असलेले आई बरीच वर्ष जपू जपू वापरीत होती. सांडस नसल्याने पदराने धरून चुलीवरले भगुने उतरून घ्यायची. एकाच परातीत दोघे दोघे जेवायचे कारण घरात दोन दोनच जरमनच्या पराती, वाट्या,





तांबे असायचे. त्यातला मोठा तांब्या तर हागणदारीलाही वापरायचे. पुन्हा राखेने घासून खंगाळून तोच तांब्या पाणी प्यायला घ्यायचे'. अशा आणि ब–याच प्रसंगातून लेखकाच्या बालपणीची हालाकीची परिस्थिती सचित्र उभी करण्यात लेखक यशस्वी झाले आहेत. शिक्षक म्हणून सेवा काळात विविध परीक्षेत घेतलेली कॉपी विरोधी भूमिका, प्रभारी मुख्याध्यापक म्हणून काम करताना विद्यार्थी हितासाठी घेतलेल्या कठोर भूमिका यातून निर्माण झालेले शत्रु व त्यामुळे आलेली अनेक संकटं यात चित्रीत करण्यात लेखक यशस्वी झाले आहेत. शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार लेखकांनी उघडपणे मांडला आहे. ऊस तोड कामगारांसाठी शासनाने सुरू केलेल्या हंगामी वस्तीगृहाच्या चालकांनी राजकीय नेत्यांच्या आणि शिक्षण विभागातील भ्रष्ट अधिका–यांच्या पाठींब्यामुळे केलेली कोटयावधी रूपयांच्या शासकीय निधीची लुट आणि लेखकाने हा भ्रष्टाचार रोखण्यासाठी केलेले प्रयत्न शिक्षण क्षेत्राचे वास्तव दाखवणारे आहेत. हल्ली पुरस्कार कसे मिळतात, याचे यथोचित वर्णन लेखकाने केले आहे. जिल्हा परिषद माध्यमिक शाळेचा प्रभारी मुख्याध्यापक म्हणून काम करत असताना 'सुट्टी विना शाळा' हा आगळा वेगळा उपक्रम आणि यातच सहकारी शिक्षिकेने दाखल केलेला खोटा विनयभंगाचा गुन्हा यामुळे प्रशासनाने या उपक्रमाकडे केलेले दुर्लक्ष, सेवानिवृतीनंतर पेन्शन साठी केलेला संघर्ष अशा अनेक प्रसंगातून लेखकाचा एकूण जीवनसंघर्ष व शिक्षकी पेशाशी असणारी प्रामाणिकता लक्षात घेण्याजोगी आहे.आत्मचरित्र लिहिणे खूप कठिण असते. कुठल्याही आत्मचरित्रात लेखकाचे संपूर्ण जीवन कधीही येत नाही. शिवाय काही घटना–प्रसंगांचे विस्मरण झालेले असते. मात्र ज्या काही घटना आठवतात आणि महत्वाच्या वाटतात त्या अगदी बारीक सारीक तपशिलासह लेखकाने मांडल्या आहेत. आपल्या आयुष्याकडे तटस्थपणे पाहणे अवघड असते. ते ज्याला जमते तो आपल्या वर्तनाचा वस्तुनिष्ठ विचार करू शकतो. परखड आत्मपरीक्षण करू शकतो आणि प्रामाणिकपणे आपल्या आयुष्याचा पट वाचकांसमोर उभा करू शकतो. जागरण' या आत्मचरित्रा द्वारे गत जीवनाचा आलेख तटस्थपणे काढण्यात लेखक यशस्वी झाले आहेत. तशी भारत सातपुते यांची आणि माझी फार ओळख नाही आणि प्रत्यक्ष कधी भेट ही नाही परंतु या आत्मचरित्र वाचनातून हा व्यक्ती आणि त्यांचे एकूण व्यक्तीतत्व कसे असेल याचे चित्रच माझ्यासमोर उभा टाकले. हे आत्मचरित्र लेखकाला वाचकांच्या नजरेत सामान्याकडून असामान्याकडे नेणारे आहे. आम्हा वाचकांना सुद्धा प्रेरणादायी आहे. 'जागरण' हे आत्मचरित्र सुविचारांचा जागर करणारे आहे. मी काही अभिजात लेखक, साहित्यिक किंवा समीक्षक नाही. माझ्या परीक्षणाची भाषा अलंकारिक, साहित्यिक चौकटीत कदाचित बसणार नाही. जवळपास ६० पुस्तके प्रकाशित असणाऱ्या श्री. भारत सातपुते यांच्या आत्मचरित्राचे परीक्षण करण्याइतका मी नक्कीच मोठा नाही. श्री. भारत सातपुते यांच्या 'जागरण' या आत्मचरित्रास माझ्या खूप–खूप शुभेच्छा

**पुस्तक : जागरण**
**लेखक : भारत सातपुते**
**(८०८७६९५०००)**
**प्रकाशक : मांजरा प्रकाशन, लातुर**
**पृष्ठे : ३०२**
**किंमत : ६०० रुपये**



**सुरेश मंत्री,**
**अंबाजोगाई.**
संपर्क: ९४०३६५०७२२

# दप्तराविना शाळेत..

दप्तरा विना शाळेत आनंददायी
शनिवार ,
खूप आम्ही शिकणारं,मौज मजा
करणार।।धृ।।
दप्तरा विना शाळेत, सकाळी.....
सकाळी
सकाळी सकाळी लवकर,रोज आम्ही
उठणार
योगाआणि प्राणायम, रोज आम्ही
करणार
दप्तरा विना शाळेत...................
...।।१।।
दप्तरा विना शाळेत , पाठीला... दप्तरं
आज नाहीअसणार,तरीआम्ही
शिकणार
आनंददायी शिक्षण ,रोज आम्ही
घेणारं
दप्तरा विना
शाळेत....................।।२।।
दप्तरा विना शाळेत , कृतियुक्त
शिक्षण
कृतियुक्त शिक्षण,अनुभवातून
मिळणार
अनुभवाची शिदोरी आम्हां ला
तारणार
दप्तरा विना शाळेत...................
..।।३।।
दप्तरा विना शाळेत, खेळातून शिक्षणं
खेळातून शिक्षण आज आम्हां
मिळणार
खेळातला आनंद , आज आम्ही
घेणारं
दप्तराविना शाळेत...................
.।।४।।

दाप्तरा विना शाळेत ,प्रश्नमंजुषा
रमणारं
प्रश्न मंजुषा रमुनी, ज्ञानरत्न ही
होणार
ज्ञानरत्नही होण्यास,खुप अभ्यास
करणार
दप्तरा विना शाळेत...................
.।।५।।
दप्तराविना शाळेत,शब्दांवर बोलू काही
शब्दवर बोलू काही , शब्दांवर
बोलणारं
शब्दांवर बोलुनी, व्यक्त आम्ही
होणार
दप्तरा विना
शाळेत..................।।६।।
दप्तरा विना शाळेत ,गाणी आणि
कविता
गाणी आणि कविता, छान !छान
गाणारं
शाळेबाहेरच्या शाळेत व्यक्तीमत्वही फुलणार
दप्तरा विना
शाळेत....................।।७।।
दप्तरा विना शाळेत कला गुणांची
मैफील
कला गुणांच्या संधीने ,वाव आम्हां
मिळणारं
शाळाआमचीअभिमान,आम्ही खूप
शिकणार
दप्तरा विना
शाळेत....................।।८।।

**हरिश्चंद्र खेंदाड.**
(गडकाव्यांजलीकार)

# जन सुरक्षा की जन नियंत्रण? जन सुरक्षा कायद्यावर संविधानवादी प्रतिवाद..

**सुरक्षा** हवीच, पण स्वातंत्र्य गमावून नव्हे!महाराष्ट्र विधिमंडळात सादर करण्यात आलेल्या व नुकत्याच पारीत करण्यात आलेल्या 'जन सुरक्षा विधेयक २०२४' ( The Maharashtra Public Security Act ) ने राज्यातील नागरिक स्वातंत्र्यांवर गदा आणली आहे. या कायद्याचा मूळ उद्देश म्हणजे ''सार्वजनिक सुव्यवस्था राखणे,'' पण त्यामागे सत्तेतील लोकांच्या नियंत्रणवादी आणि नागरिकद्वेषी मनोवृत्तीचे बीज स्पष्ट दिसते आहे.

हा केवळ एक कायदा नाही, तर एक विचारसरणी आहे – जी 'सुरक्षे'च्या नावाखाली लोकशाहीच्या मुळांवर घाव घालते. हे विधेयक फक्त काही कलमांचे संकलन नाही; तर ते व्यक्तिस्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि एकंदर लोकशाही संपवण्याचे कारस्थान आहे हे नीट लक्षात घ्यायला हवे.

**विधेयकाचा सारांश (मुख्य कलमांवर एक नजर)**

१. 'संशयास्पद व्यक्तींवर प्रतिबंधात्मक कारवाई' करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी आणि पोलीस अधिकाऱ्यांना

२. 'सार्वजनिक शांततेला धोका' निर्माण करणाऱ्या व्यक्तींना निवारणाशिवाय तडीपार करता येणे

३. व्यक्ती किंवा गटांवरप्रतिबंधात्मक नजरकैद, नजरबंदी

४. फेसबुक, सोशल मीडिया पोस्ट्सवरील कारवाईचे अधिकार

५. 'जनतेच्या मनात अस्वस्थता, सरकारविरोधी भावना निर्माण करणाऱ्या' कार्यकर्त्यांवर नजर ठेवण्याची तरतूद

हे वाचताच मनात येते हे काय भारतीय राज्यघटनेचे मुल्याधिष्ठान असलेले विधेयक आहे की बिर्सा मुंडा, भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांना 'अराजकवादी' ठरवणाऱ्या

**ब्रिटिश राजवटीचे पुनरागमन?**

**घटनात्मक मूल्यांशी विसंगती**

१. कलम १९: अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा गळा कापणारे विधेयक: भारतीय संविधानाच्या कलम १९(१)(a) नुसार प्रत्येक नागरिकास अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क आहे. हे विधेयक मात्र त्या अभिव्यक्तीला 'अराजक' ठरवून तिला शिक्षा करण्याचा मार्ग मोकळा करते. एखादा समाजकार्यकर्ता सरकारच्या धोरणावर टीका करतो, तर त्याला 'सार्वजनिक सुव्यवस्था धोक्यात घालणारा' ठरवले जाते.

२. कलम १४ आणि २१: समानता व वैयक्तिक स्वातंत्र्य: 'माझ्या इच्छेने मी कुठे जाईन, कुणाला भेटेन, काय बोलेन' यावर नियंत्रण हे संविधानाच्या मूलभूत हक्कांच्या विरोधात आहे. पण या कायद्याने पोलीस आणि जिल्हाधिकाऱ्यांना अशा व्यक्तींना गावाबाहेर पाठवण्याचा किंवा नोकरीपासून दूर ठेवण्याचा अधिकार दिला आहे.

इतिहासातील सावधानतेचे संकेत

१. ब्रिटिशकालीन 'रॉलेट कायद्या'ची आठवण:
१९१९ मध्ये ब्रिटिशांनी ''रॉलेट ॲक्ट'' आणला होता, ज्याने कोणत्याही आरोपांशिवाय भारतीयांना अटक करता येत होती.
आजच्या 'जन सुरक्षा विधेयका' मधील प्रतिबंधात्मक अटक, निवारणाशिवाय तडीपार, ही त्या काळाचीच आधुनिक आवृत्ती वाटते.

२. **आपात्कालीन** (Emergency) **काळातील दडपशाही:**
१९७५ च्या आणीबाणीच्या काळात जेव्हा ''राष्ट्रसुरक्षेसाठी'' पत्रकार, साहित्यिक, आंदोलक यांना जेलमध्ये टाकण्यात आलं, तेच आता जन सुरक्षेच्या नावाखाली पुन्हा घडताना दिसते.

**जागतिक संदर्भ: लोकशाहीत अशा कायद्यांना हरकत घेणारे जागतिक ठराव**

१. युरोपियन युनियनमध्ये मानवाधिकार आयोग अशा कायद्यांना प्रतीबंधात्मक (Preventive Oppression ) ठरवतो.

२. ने असे स्पष्ट केले आहे की 'Public order laws must not override fundamental freedoms."

३. (US Supreme Court (Brandenburg v. Ohi . ) मध्ये ठरवले की, केवळ सरकारविरोधी विचार मांडल्यामुळे व्यक्तीला गुन्हेगार ठरवता येत नाही.

काय आहेत विधेयकाचे संभाव्य धोके?

* पत्रकारांवर गुन्हे दाखल
* कार्यकर्त्यांना तडीपार
* विरोधकांवर राजकीय सुडभाव
* निषेध मोर्च्यांचे दमन
* सोशल मीडियावर पोस्ट करणाऱ्यांवर गुन्हे

**लोकशाहीतील वैचारिक संघर्ष 'आवाजाने' होतो. आता तो 'तडीपाराने' होईल का?**

संविधानवादी प्रतिवाद: विरोध करणे ही जबाबदारी

कायद्याच्या राज्यात सरकार लोकांचे सेवक असते, मालक नाही. सरकारविरोधी टीका करणे, लोकांना त्यांच्या हक्काबाबत जागरूक करून लोकांतील अस्वस्थतेला वाचा फोडणे ही पत्रकार, लेखक, साहित्यिक, लोककलावंत यांची जबाबदारी असते. अशाप्रकारच्या विरोधातूनच लोकशाही अधिकाधिक समृद्ध होत असते, विकसित होत असते.हा कायदा लोकांना संशयाच्या नजरेने पाहतो. ही '' '' च्या तत्त्वाला दिलेली थेट तिलांजली आहे.

मग, आता आपण काय करावे?

* या कायद्याला लोकशाही विरोधी ठरवणे गरजेचे आहे.
* जागरूक नागरिक, वकील, पत्रकार, कार्यकर्ते, विद्यार्थी यांनी विरोधाचे सूर लावणे अत्यावश्यक आहे.
* राज्यपालांनी हे विधेयक राज्यसभागृहात पुनर्विचारासाठी परत पाठवावे.
* घटनेच्या चौकटीत राहून सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याचा मार्गही खुला आहे.

जनतेसाठी कायदा की जनतेवर कायदा व जनतेच्या मूलभूत हक्कांवर गदा?

* जन सुरक्षा कायदा हा 'जन दमन कायदा' आहे.
* हा कायदा नाही, हा लोकशाहीची वाट लावणारा हुकूमशाही फतवा आहे.

चुप्पी तोडो

''क्रांतीची तलवार ही विचारांच्या सहानेवर परजली जाते'' असे शहीद भगतसिंग सांगतात. जगातल्या सगळ्या बदलामागे विचार आहे. जगातले सगळे बदल अभिव्यक्ती स्वातंत्र्यंतूनच जन्माला आले आहेत. महाराष्ट्रातील स्वराज्याची क्रांतीदेखील शहजीराजे–जिजाऊ–शिवबा यांच्या शोषणविरोधी व समतावादी विचारांतून घडली, हा गौरवशाली इतिहास आपल्याकडे आहे. आज त्याच महाराष्ट्रात सर्वसामान्यांचा आवाज दाबू पाहणारा कायदा येऊ घातला आहे.

स्वातंत्र्य हे सैनिकांच्या रणभूमीतील बळासोबतच विचारवंतांच्या लेखणीवर आणि कार्यकर्त्यांच्या रक्तावरही कोरले गेले आहे. आज तो इतिहास पुन्हा रचायचा की नष्ट करायचा, हा निर्णय आपल्या 'निर्बंधित आवाजा'च्या ऐवजी 'निर्भीड विचारां'वर अवलंबून आहे. म्हणून निर्भिडपणे बोलूया, व्यक्त होवूया, बोलणाऱ्यांवर, लिहिणाऱ्यांवर, व्यक्त होणाऱ्यावर निर्बंध आणणाऱ्या कायद्याला सर्व लोकशाही मार्गाने विरोध करूया.



**ॲड. शीतल शामराव चव्हाण**
(मो.९९२१६५७३४६)

# चिमाचा रूसवा

चिमा रूसली कोपऱ्यात बसली
बाबाला नाही बोलली
आईला नाही बोलली
दादाला ही नाहीच बोलली...
शाळेला जायला
तयार नाही झाली
कोणालाच कळेना
करावे तरी काय
रूसूबाईचा रूसवा
काढायचा काय उपाय?
आई म्हणाली
आवडीचा खाऊ देऊ ?
दादा म्हणाला माझी
नवी सायकल देऊ ?
पण रूसवा काही जाईना
गोबऱ्या गाली हसू काही येईना...
बाबानी केली युक्ती छान
कपाटातून काढले दप्तर नवीन...
पुस्तक,वही ,पेन्सिल,पेन
रबर ,कंपास नी रंगपेटी छान...
पाहून चिमा गेली हरखून
रूसवा गेला लगेच पळून...
गोबऱ्या गाली आता हसू येई
शाळेला जायची लागली घाई...

**सुभाष रामलिंगप्पा वैरागकर**
९४२३७६५०३१

# आई म्हणून झिजते

तिच्या पायात बेड्या
तरी चालते ती न थांबता
दुखं लपवते हसून
जगासाठी ती झुरता

सारे होतात आजाद
उडतात स्वप्नात नभी
आईच मात्र बांधलेली
वेदना भिडतात नभी

तिच्या हातात उरतो
नेहमी फक्त उष्टा घास
तसं स्वप्न तिचं हरवतं
उरतो फक्त संसाराचा त्रास

नशिबाची नाही तक्रार
नाही तिला श्वासांची भीक
तरी तिचं मन तस विचारतं
कुटुंबाचं काही नाही दुखः
आई म्हणून झिजते
तिची ओळखच विसरते
स्त्री म्हणून ती कधीच
स्वतःला उलगडत नाही



**सौ. उषाताई लांडगे,** धाराशिव

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८०,विभागीय कार्यालयः सेक्टर नंबर ३२४, ई वॉर्ड, रिवोल्युशन, ऑफिस नंबर युजी ०७,स्टेशन रोड, करवीर, कोल्हापूर RNI NO.- 2023/90078,

# कोयना धरणाचे दरवाजे उघडले

## धरणातून ५,५०० क्युसेक पाण्याचा विसर्ग

### कोयना नदीकाठच्या गावांना सावधानतेचा इशारा

**आरंभ मराठी | सातारा**

कोयना पाणलोट क्षेत्रात पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे कोयना धरणातील पाणीसाठा झपाट्याने वाढत आहे.धरणात ७६.५२ टीएमसी पाणीसाठा झाला असून धरणातील पाणी पातळी नियंत्रित करण्यासाठी कोयना धरणातून सकाळी ११ वाजता धरणाचे सहा वक्र दरवाजे उघडून ३,४०० तर पायथा विद्युतगृहातून २,१०० असा एकूण ५,५०० क्युसेक पाण्याचा विसर्ग कोयना नदीपात्रात करण्यात येत आहे.दरम्यान,धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्यामुळे ोयना नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. गेल्या २४ तासात कोयना पाणलोट क्षेत्रातील कोयना १२३ नवजा १६७ तर महाबळेश्वर येथे १९२ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. कोयना पणलोट क्षेत्रात पडणाऱ्या पावसामुळे कोयना धरणात सध्या प्रतिसेकंद २५,४७८ क्युसेक पाण्याची आवक होत आहे.कोयना पाणलोट क्षेत्रात पडणारा पाऊस व धरणातील पाणीसाठा नियंत्रित करण्यासाठी धरणातून ५,५०० क्युसेक विसर्ग कोयना नदीपात्रात करण्यात येत आहे.१०५.२५ टीएमसी क्षमता असणाऱ्या कोयना धरणाचा पाणीसाठा ७६.५२ टीएमसी झाला आहे.कोयना धरणाचे दरवाजे १५ ऑगस्ट नंतर उघडले जातात मात्र यावर्षी मान्सून पावसाने वेळे आधी सुरुवात केल्याने कोयना धरणाचा पाणीसाठा जून आखेर ५०% झाला होता.त्यामुळे १५ जुलैला कोयना धरणातील पातळी वक्र दरवाजांना



टेकल्याने कोयना धरण व्यवस्थापनाने धरणातून पाणी सोडण्याचा निर्णय घेतला.सध्या कोयना धरणाच्या पाणलोट क्षेत्रात उसंत घेतलेल्या पावसाने पुन्हा मंगळवारी सकाळपासून जोरदार सुरुवात केल्याने धरणात येणाऱ्या पाण्याची आवक वाढली आहे.कोयना पाणलोट क्षेत्रात आज अखेर कोयना २ हजार ३५० नवजा २ हजार २३५ महाबळेश्वर २ हजार ३१८ मिलिम ीटर पावसाची नोंद झाली आहे.

# उमरगा येथे करीअर कट्टा अंतर्गत विद्यार्थी करीअर संसद पदाधिकारी यांचा शपथविधी सोहळा



**आरंभ मराठी | उमरगा**

जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आयोजित करीअर कट्टा अंतर्गत विद्यार्थी करीअर संसद पदाधिकारी यांचा शपथविधी सोहळा श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथे मंगळवारी (दि.१५) दिमाखात पार पडला. कार्यक्रम ाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संजय अस्वले होते. करिअर कट्टाच्या माध्यमातून महाविद्यालयातील निवडक विद्यार्थ्यांनी ''करिअर संसद सदस्य'' म्हणून शपथ घेतली. प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी विद्यार्थी संसद पदाधिकाऱ्यांना शपथ दिली. तसेच विद्यार्थ्यांना करिअर निवड, कौशल्य विकास, आणि उद्योजकता याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी केवळ नोकरीकडे लक्ष न देता कौशल्य, उद्योजकता आणि नावीन्य यांचा विचार करून आपले भविष्य घडवावे असे मत त्यांनी व्यक्त केले. 'करिअर संसद' उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांम ध्ये करिअरबाबत जागरूकता निर्माण करणे, योग्य मार्गदर्शन पोहोचवणे आणि नेतृत्वगुणांचा विकास साधणे यासोबतच या उपक्रमातून विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रातील संधींचे भान येते, तसेच त्यांच्यातील आत्मविश्वास वाढतो. यावेळी निवड झालेल्या सदस्यांना प्राचार्य संजय अस्वले यांनी शपथ दिली.

कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य डॉ. पद्माकर पिटले, प्रभारी प्राध्यापक अशोक पदमपल्ले, करिअर कट्टाचे समन्वयक डॉ. चंद्रसेन करे, डॉ. समाधान पसरकल्ले, डॉ. विनोद देवकर, महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिशा सुरवसे यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रज्वल चव्हाण यांनी मानले.

# प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा कळंब येथे निषेध

**आरंभ मराठी | कळंब**

संभाजी ब्रिगेडचे नेते प्रवीण गायकवाड यांच्यावर नुकताच झालेला भ्याड हल्ला हा लोकशाही आणि सामाजिक सलोख्याविरोधातील कृत्य असून या घटनेचा तीव्र निषेध करत संभाजी ब्रिगेडच्या वतीने तहसीलदारांना निवेदन सादर करण्यात आले. अक्कलकोट (जि. सोलापूर) येथे १३ जुलै २०२५ रोजी संभाजी ब्रिगेडचे राज्यस्तरीय नेते प्रवीण गायकवाड यांच्यावर काही समाजकंटकांनी शाई फ ेकून जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता. या घटनेच्या निषेधार्थ संभाजी ब्रिगेडच्या वतीने आज कळंब येथील तहसीलदार कार्यालयात आंदोलन करून निवेदन




सादर करण्यात आले.तहसील कार्यालयासमोर झालेल्या या निषेध आंदोलनात अनेक कार्यकर्ते सहभागी झाले होते. निषेधाच्या घोषणा देत त्यांनी घटना विरोधात आपला रोष व्यक्त केला. या निवेदनावर संभाजी ब्रिगेडचे प्रदेश संघटक अतुल गायकवाड, जिल्हाध्यक्ष ॲड. तानाजी चौधरी, ॲड. अशोक चोंदे, महेश कोळपे, आश्रुबा चोंदे, चेतन कात्रे, अक्षय मुळीक, विलास गुंड, मुकुंद शेळके, शरद जाधव, अनिल गायकवाड, भैय्या पवार, शरद शेळके, सुंदर बापू लोमटे, इम्रान मिर्झा, ज्योतीताई सपाटे, तसेच अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी स्वाक्षऱ्या करून आपला तीव्र निषेध नोंदवला. तहसीलदारांनी निवेदन स्वीकारून योग्य ती कारवाई केली जाईल, असे आश्वासन दिले.

# जुनी पेन्शन योजना त्वरित लागू करा

## कोअर कमिटी जिल्हा शाखेची शासनाकडे मागणी

**आरंभ मराठी | धाराशिव**

महाराष्ट्र शासनातर्फे सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आलेल्या शपथपत्राची प्रत देण्यात यावी, जुनी पेन्शन योजना त्वरित लागू करावी,अशी मागणी शिक्षण संघर्ष संघटना जुनी पेन्शन कोअर कमिटी जिल्हा शाखेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.निवेदनात म्हटले आहे की महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन कोर कमिटी व शिक्षण संघटनेच्या अध्यक्षा डॉ.संगीता शिंदे –बोंडे यांनी ८ व ९ जुलै रोजी आझाद मैदान मुंबई येथे आंदोलन स्थळाच्या शिष्टमंडळाला शालेय शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी दिलेले आश्वासन दिनांक १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त खाजगी विनाअनुदानित,अंशतः अनुदानित असलेल्या व २००५ नंतर १००% टक्के अनुदानावर आलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १९८२ ची जुनी पेन्शन लागू करण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे सर्वोच्च न्यायालयात शपथपत्र दाखल करण्यात न आल्यामुळे १४ व १५ जुलैपासून संघटनेच्या राज्यातील पेन्शन पीडित बांधवांच्या समवेत आझाद मैदान येथे आंदोलन करण्याचा पवित्रा घेण्यात आला होता.परंतु अधिवेशन काळात मुंबई येथे संघटनेच्या अध्यक्षा डॉ.संगीता शिंदे




बोडे यांनी ८ व ९ जुलै रोजी शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांची भेट घेतली असता शासनातर्फे जुन्या पेन्शनबाबत सकारात्मक शपथपत्र सर्वो च्च न्यायालयात सादर करण्यात आले असून, लवकरच जुनी पेन्शन बाबत कार्यवाही करणार असल्याचे आश्वासन दिले आहे तसेच ७ व ८ जुलै रोजी आझाद मैदान येथे झालेल्या आंदोलनात शिष्टमंडळासोबत हाच पुनर्विचार शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी केला आहे तसेच शिक्षण राज्यमंत्री पंकज जी भोयर यांनी सभागृहात सुद्धा असेच मत व्यक्त केले आहे. परिणामी शिक्षण मंत्र्याच्या शब्दाला दिनांक १५ जुलै रोजीचे नियोजित आंदोलन स्थगित करण्यात आले आहे. परंतु या सकारात्मक शपथपत्रात नेमके काय असेल ?, हे जाणून घेण्याची उत्सुकता राज्यातील बांधवांना लागली आहे. महाराष्ट्र शासनाने सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या सकारात्मक शपथपत्राची प्रत संघटनेला देण्यात यावी तसेच जुनी पेन्शन योजना लवकरात लवकर लागू करण्यात यावी अन्यथा आमच्या पेन्शनची दखल न घेतल्यास २६ प्राचार्य,मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचारी जलसमाधी आंदोलन करणार असल्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. यावेळी शिक्षण संघर्ष संघटना राज्य उपाध्यक्ष संजय कळकुंबे, मराठवाडा शिक्षण संघटनेचे जयपाल शेरखाने, श्रीयुत मोरे, वीर सर,दीरगुळे सर, पवार सर,बोराडे सर, भोगील सर,नागरगोजे सर शिंदे सर,शेख सर, कुरुलकर सर, मि साळ सर आदी शिक्षक बांधव उपस्थित होते.

# प्रवीण गायकवाड यांच्यावरील भ्याड हल्ल्याला जळजळीत प्रत्युत्तर मिळणार-संभाजी ब्रिगेडचा उमरगा येथे निर्धार

## विचारांची लढाई विचारानेच, परंतु मुद्द्याला मुद्द्याने आणि गुद्धाला गुद्धाने उत्तर देण्याचा इशारा

**आरंभ मराठी | उमरगा**

अक्कलकोट येथे संभाजी ब्रिगेडचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर भाजपचा कार्यकर्ता दिपक काटे व त्याच्या साथीदारांनी केलेल्या भ्याड हल्ल्याचा उमरगा येथे संभाजी ब्रिगेड, समविचारी संघटना आणि विविध राजकीय पक्षांच्या वतीने तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला. या पार्श्वभूमीवर मंगळवारी (ता. १५ जुलै) उमरगा तहसील कार्यालयात तहसीलदार गोविंद येरमे यांना निवेदन सादर करण्यात आले. यावेळी मराठा सेवा संघाचे भूमिपुत्र वाघ, माजी जिल्हा परिषद सदस्य हरिष डावरे, काँग्रेस अल्पसंख्याक जिल्हा उपाध्यक्ष पी. ए. इनामदार, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष राम गायकवाड, संभाजी ब्रिगेड महिला आघाडी तालुकाध्यक्ष शितल भोसले, जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेश प्रवक्त्या रेखा सूर्यवंशी, इतिहास अभ्यासक मोहन जाधव, संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष अण्णासाहेब पवार आदींनी मनोगत व्यक्त केले. यावेळी उपस्थितांनी प्रवीण गायकवाड यांच्या आक्रमक नेतृत्वाचे जोरदार समर्थन करत हल्लेखोरांवर तात्काळ कठोर कारवाई करण्याची जोरदार मागणी केली. त्यांनी स्पष्टपणे नमूद केले की, प्रवीण गायकवाड यांच्या कार्यामुळे समाजातील अन्याय, अंधश्रद्धा आणि पाखंडाविरुद्धचा लढा अधिकच धारदार झाला आहे. तर यावेळी बोलताना वक्त्यांनी सांगितले की, हल्लेखोरांनी काळी शाई




फेकून समाजाच्या विचारांवर आघात करण्याचा भ्याड प्रयत्न केला, मात्र ही काळी शाईच समाजजागृतीची मशाल बनणार असल्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. प्रवीण गायकवाड यांनी अन्यायकारक व्यवस्थेविरोधात आक्रम क भूमिका घेतली असून त्यांच्या विचारांनी लाखो युवकांना प्रेरणा दिली आहे. अक्कलकोट येथील हल्ला केवळ त्यांच्यावर नाही, तर सत्य, विचार व प्रबोधनावर हल्ला आहे, असे ठाम मत व्यक्त करण्यात आले.या निषेध आंदोलन कार्यक्रमास काँग्रेसचे विजय वाघमारे, अर्जुन बिराजदार, राष्ट्रवादीचे शंतनू सगर, जिजाऊ ब्रिगेडच्या सुनंदाताई माने, श्वेताताई मुगळे, रेखाताई पवार, प्रीतीताई जाधव, टिपू सुलतान ग्रुपचे बाबा कुरेशी, हुसेन तांबोळी, संभाजी ब्रिगेडचे गोविंद सोबाजी, सुरज देशमुख, काशिनाथ पाटील, राजेंद्र माळी, बिभीषण कांबळे, सदानंद कांबळे, इसाक शेख, प्रदीप पाटील, नागेश स्वामी, शिवकांत पतगे, हनुमंत सुरवसे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला नवे पंख, नवनिर्मिती आणि साहित्य हाताळत वाढतेय शिक्षणातील गोडी

## पिंपळा खुर्द येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा प्रेरणादायी उपक्रम

**आरंभ मराठी | तुळजापूर**

शिक्षण मंत्रालय व समग्र शिक्षण अभियानाच्या पुढाकाराने 'निपुण भारत' या शैक्षणिक अभियानाअंतर्गत राज्यातील शाळांमध्ये विविध शैक्षणिक साहित्याच्या पेट्यांचे वितरण करण्यात आले आहे. यामागील मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान वाढवणे, तसेच त्यांच्यामध्ये विषयांची समज स्पष्ट करणे हा आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळा खुर्द येथील उपक्रम त्याचे उत्तम उदाहरण ठरत आहे. शाळेतील इयत्ता तिसरीतील विद्यार्थ्यांनी मराठी, गणित, इंग्रजी आणि परिसर अभ्यास या विषयांतील शैक्षणिक साहित्याचा अतिशय कल्पकतेने व उत्साहाने वापर केला. शिक्षक विठ्ठल नरवडे यांनी साहित्य हाताळणी, त्याचा वापर व मुलांनी कल्पकता कशी दाखवावी याचे म ार्गदर्शन केले. या उपक्रमातून विविध आकारांची ओळख, प्रतिमा बनवणे, वर्णमाला, संख्यांची समज, संकल्पना स्पष्ट करणे, वाचन–लेखन क्षमता वाढवणे आदी बाबतीत या साहित्याचा मोठा उपयोग झाला आहे. या साहित्य पेट्यांमध्ये समाविष्ट असलेल्या आकर्षक, रंगीत आणि स्पर्शात्मक वस्तूंमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची गोडी वाढलेली दिसून आली. शिक्षण हे फक्त पुस्तकांपुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष कृतीतून अनुभव घेता येते, हे या उपक्रमामुळे अधोरेखित झाले आहे. विद्यार्थी वर्गातील म ुलांनी स्वतःच्या कल्पनाशक्तीचा वापर करून विविध प्रतिमा तयार केल्या, आकृती बांधल्या, खेळत–शिकत शिक्षण घेतले. विशेषतः कारक कौशल्यविकसनाच्या दृष्टीने ही शैक्षणिक साधने उपयुक्त ठरली. विद्यार्थ्यांनी या साहित्याचा वापर करून व्यक्त होण्याची संधी मिळवली. खेळातून व कृतीतून मिळणाऱ्या ज्ञानामुळे ते अधिक आत्मसात करू लागले. शिक्षकांच्या मार्गदर्शनात झालेला हा शिक्षणाचा प्रयोग



विद्यार्थी–केंद्रित शिक्षणाचा आदर्श ठरतो.'निपुण भारत' अंतर्गत आलेल्या साहित्य पेट्यांमुळे शाळेत आनंददायी शिक्षण वातावरण तयार झाले आहे. ही साधने विद्यार्थ्यांना केवळ ज्ञानाची दिशा देत नाहीत, तर त्यांच्यामधील सर्जनशीलतेला, निरीक्षणशक्तीला, संवादकौशल्याला आणि सहकार्याच्या वृत्तीला चालना देतात. या माध्यम ातून विद्यार्थ्यांचे सर्वांगीण व समतोल विकास साधणे शक्य होत आहे.

### कृतीतून शिक्षणाचा आनंद घेण्यासाठी उपक्रमाचा फायदा

अशा उपक्रमांमुळे शिक्षण केवळ पुस्तकापुरते मर्यादित न राहता कृतीतून शिकू शकतात. कार्यक्रम व शैक्षणिक साहित्य हाताळताना त्यांची निरीक्षणशक्ती, विचारशक्ती आणि निर्णयक्षमता विकसित होते. समूहामध्ये काम करताना मुलांमध्ये सहकार्य, नेतृत्त्व व संवाद कौशल्य आत्मसात होतात. शैक्षणिक साहित्य हाताळण्याच्या प्रक्रियेतून मुलांना संकल्पना अधिक स्पष्ट व समजण्यास सुलभ होतात. या उपक्रमांमुळे शाळेतील वातावरण आनंदी व शिक्षणात रस निर्माण करणारे बनते.

**विठ्ठल नरवडे**
शिक्षक – पिंपळा खुर्द

# निर्मिती नागरी सहकारी पतसंस्थेचे उद्घाटन




**आरंभ मराठी | धाराशिव**

दुर्बलांना मदत करतो आणि सबळांची मदत घेतो तो सहकार. या सहकार क्षेत्राला १२५ वर्ष पूर्ण होत आहेत. निर्मिती नागरी सहकारी पतसंस्था ही येणाऱ्या काळात धाराशिव जिल्ह्यात सहकारी क्षेत्रात नाव लौकीक करेल अशी अपेक्षा न्यू सातारा ग्रुप ऑफ को –ऑपरेटीव्हचे संचालक राजाराम निकम यांनी व्यक्त केली. शहरातील श्री. अनंतदास महाराज स्मारक मंदिराजवळील निर्मिती नागरी सहकारी पतसंस्थेचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सम र्थभक्त मोहनबुवा रामदासी तर प्रमुख अतिथी म्हणून न्यू सातारा ग्रुप ऑफ को –ऑपरेटीव्हचे संचालक राजाराम निकम, जेष्ठ विधीज्ञ ॲड. मिलींद पाटील, वकील नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष तथा जेष्ठ विधीज्ञ ॲड. राजेंद्र धाराशिवकर, जनता सहकारी बँकचे संचालक आशिष मोदानी, माजी नगराध्यक्ष दत्ता बंडगर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलानाने करण्यात आली. यावेळी बोलताना सर्व मान्यवरांनी संस्थेच्या वाटचालीस शुभेच्छा देवून संस्थेच्या कार्याविषयी अनमोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सचिव गजानन नारीकर यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी संस्था स्थापनेमागील माहिती दिली. सुत्रसंचालन संचालक गजानन घुगीकर तर आभार संचालक निलेश कुलकर्णी यांनी मानले. कार्यक्रमासाठी शहरातील व्यावसायीक, मित्रमंडळी, नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com

आपलं धाराशिव

बुधवार ,दि. 16 जुलै 2025

# पावसाची महिनाभरापासून दडी; खरीप पिके संकटात

## सोयाबीनवर अळीसह येलो मोझॅक तर उडदावर मावा रोगाचा हल्ला



**सुरज बागल | आरंभ मराठी**

तुळजापूर – मे आणि जून महिन्यात पडलेल्या दमदार पावसामुळे तुळजापूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी सोयाबीन, उडीद, तूर, मूग या पिकाची मोठ्या प्रमाणावर पेरणी केली. मात्र जवळपास एक महिन्यापासून पावसाने दडी मारल्याने सोयाबीन फुलधारणेच्या अगोदरच कोमेजून जात असून, त्यावर अळीचा देखील मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव झालेला दिसून येत आहे. तर मुग व उडीद यावर मावा रोग पडल्याने त्याची वाढ खुंटून हे पीक चक्क वाया जाण्याच्या मार्गावर आहे. दोन–तीन दिवसात पाऊस नाही पडला तर हजारो हेक्टर वरील सोयाबीन व अन्य पिके धोक्यात येऊन शेतकरी मोठ्या अडचणीत सापडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मे महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यात दमदार पावसाने हजेरी लावली. त्यामुळे यावर्षी शेतकऱ्यांनी लवकरच चाड्यावर मुठ धरली. तुळजापूर तालुक्यातील जवळपास ९५ टक्के क्षेत्रावर पेरणी झाली असून, एकूण १ लाख ५ हजार १८० हेक्टरवर शेतकऱ्यांनी पेरणी केली आहे. त्यामध्ये एकट्या सोयाबीनची ८६ हजार ९८१ हेक्टर एवढी पेरणी झाली आहे. तर तूर ७२७० हेक्टर, उडीद ४९८९ हेक्टर तर मुगाची ४७५० हेक्टरवर पेरणी झाली आहे. सुरुवातीच्या काही दिवसात पिके चांगली दिसत होती. मात्र गेल्या एक महिन्यापासून एकही मोठा पाऊस झाला नसल्याने शेतकरी संकटात सापडला आहे. ऐन फुलधारणेच्या अवस्थेत कडक ऊन पडत असल्याने ही पिके कोमेजून जात आहेत. पाऊस नसल्याने पावसाअभावी पडणाऱ्या विविध रोगांचाही फटका या पिकांना बसत असून आळी, मावा हे रोग मोठ्या प्रमाणावर पसरत आहेत. पाऊस न पडता नुसत्या ढगाळ वातावरणाच्या निर्मितीमुळे पानावर अळीचा प्रादुर्भाव होत आहे. ज्या शेतकऱ्याकडे पाण्याची सोय आहे ते शेतकरी ठिबक सिंचन, तुषार सिंचन याचा वापर करून पाणी देऊन पिके जगवण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र अनेक शेतकऱ्यांकडे पाण्याची उपलब्धता नसल्याने त्यांची पिके वाया जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे आगामी काळात लवकर पाऊस न झाल्यास खरीप हंगाम हातातून जाण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत.

### फवारणीवरच होतोय मोठा खर्च

पिकावर रोगांचे संकट आल्याने हजारो रुपयांची कीटकनाशके घेऊन शेतकऱ्यांना फवारणी करावी लागत आहे. त्यामुळे मोठा आर्थिक भुर्दंड शेतकऱ्यांना सहन करावा लागत आहे. पाऊस असेल तरच फवारणी केलेल्या पिकांना त्याचा फायदा होतो. मात्र, पाऊसच नसल्याने फवारणी केलेला खर्चदेखील वाया जात आहे. मागील चार दिवसांपासून उन्हाची तीव्रता देखील मोठ्या प्रमाणात वाढली असून, बळीराजा चिंताग्रस्त दिसत आहे. सध्या सुरू असलेले पुनर्वसू नक्षत्र संपूर्ण कोरडे गेल्यामुळे बळीराजाची चिंता वाढली आहे.

### चार दिवसात पाऊस न झाल्यास मोठे नुकसान

हजारो रुपयाचे बियाणे व खते आणून पेरणी केली आहे. सध्या पावसाने उघड दिल्यामुळे पिके कोमजून जात आहेत. आगामी काही दिवसात पाऊस न झाल्यास ही पिके हातातून जाऊन मोठे आर्थिक नुकसान होणार आहे.

**मेहबूब शेख**

शेतकरी, कात्री ता. तुळजापूर.

### पाऊस नसल्याने रोगांचा प्रादुर्भाव

उसनवारी करून बियाणे तसेच खते आणली आहेत. चांगल्या उत्पन्नाची आशा बाळगून पेरणी केली आहे. मात्र, आता रोगांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर झाला असून पाऊस नसल्याने पिके कोमेजून जात आहेत.

**शेखर चौगुले**

शेतकरी, सांगवी मार्डी.

### पिकांना पावसाची गरज

उडदावर मावा रोग पडल्याने त्याची वाढ खुंटली असून सोयाबीनवर देखील आळी दिसून येत आहे. एकूणच हा खरीप हंगाम हातातून जाण्याची शक्यता असून, मोठे आर्थिक नुकसान होणार आहे . सध्या पिकांना पावसाची खूप गरज असून, चार दिवसात पाऊस पडला तरच पिके जगतील.

**मारुती नागदे**

शेतकरी, सारोळा ता. तुळजापूर .

# आरिज एजाज शेख याचा चौथा वाढदिवस मूकबधिर विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून साजरा




**आरंभ मराठी | कळंब**

कळंब शहरातील लहानग्या मो. आरिज ऐजाज शेख याचा चौथा वाढदिवस आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात आला. या खास दिवशी मो. आरिज याच्या कुटुंबीयांनी येथील संत ज्ञानेश्वर महाराज निवासी मूकबधिर विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून आनंद वाटला. सामाजिक भान जपत आणि संस्कारांची जपणूक करत शेख परिवाराने हा उपक्रम राबविला. मूकबधिर मुलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणारा हा प्रसंग उपस्थितांचे मने जिंकून गेला. खाऊ वाटपामध्ये बिस्किटे, फरसाण, चॉकलेट्स आणि फळांचा समावेश होता. कार्यक्रमानंतर शाळेतील शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनीही या उपक्रमाचे कौतुक केले. मो. आरिजच्या पालकांनी सांगितले की, ''वाढदिवस केवळ केक कापून साजरा न करता, दुसऱ्यांमध्ये आनंद वाटून साजरा केल्यास मुलांमध्ये सहवेदना आणि सामाजिक जाणीव निर्माण होते.'' हा उपक्रम एक प्रेरणादायी पाऊल ठरला असून, अनेकांनी शेख कुटुंबीयांचे मनापासून अभिनंदन केले. यावेळी एजाज शेख, बुरानोद्दीन शेख, शाळेचे मुख्याध्यापक बालाजी जाधवर, सर्व शिक्षक वृंद आणि ५५ विद्यार्थी उपस्थित होते.

# नूतन विद्यामंदिर येथे सखी सावित्री शालेय समितीची आढावा बैठक उत्साहात

**आरंभ मराठी | धाराशिव**




समाजात महिलांच्या सशक्तीकरणासाठी शिक्षण क्षेत्रातही महिलांचा सक्रिय सहभाग अत्यंत आवश्यक आहे. हाच उद्देश लक्षात घेऊन नूतन प्राथमिक विद्यामंदिर येथे ''सखी सावित्री शालेय समिती'' ची स्थापना करण्यात आली आहे. या समितीचा उद्देश पालक महिलांना शाळेच्या कार्यामध्ये प्रत्यक्ष सहभागी करून घेणे, मुलींच्या शिक्षणास चालना देणे आणि शाळेतील वातावरण अधिक सुरक्षित व समंजस बनवणे हा आहे. सावित्रीबाई फुले यांच्या प्रेरणेतून ही समिती कार्यरत राहील. या आढावा बैठकी प्रसंगी उपस्थित प्रमुख पोलिस उपनिरिक्षक अनघा गोडगे यांनी महिलांच्या भूमिकेचे महत्त्व अधोरेखित करत शालेय विकासामध्ये त्यांचा सहभाग प्रेरणादायी ठरेल, असे प्रतिपादन केले. तसेच सर्व व्यवस्थेची पाहणी केली असता, मुलींच्या सुरक्षिततेची योग्य काळजी या ठिकाणचे असणारे मुख्याध्यापक यांनी उत्तम प्रकारे केल्यामुळे त्यांचे विशेष कौतुक करण्यात आले. यावेळी विद्यार्थिनींच्या समस्या व गरजा ओळखणे,स्वच्छता, आरोग्य व पोषण याबाबत जनजागृती,मुलींमध्ये आत्मविश्वास वाढवण्यासाठी विविध कार्यशाळा, पालक–शिक्षक समन्वय वाढवणे यावर चर्चा करण्यात आली. या उपक्रमामुळे शाळा व पालक यांच्यातील नातेसंबंध अधिक दृढ होतील व विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी नवा अध्याय सुरू होईल, असा विश्वास शाळेचे मुख्याध्यापक प्रदीपकुमार गोरे यांनी व्यक्त केला. या बैठकीसाठी समितीचे सदस्य मनिषा माने, गायकवाड, संजय जाधव, राम मुंडे तसेच शाळेतील सर्व शिक्षिका उपस्थित होत्या.

# अंकुर शिशुगृहाला रोटरीकडून मदतीचा हात,नूतन अध्यक्ष,सचिवांचे दातृत्व

**आरंभ मराठी | धाराशिव**



अनाथ बाळांना आई–वडिलांची माया देणाऱ्या धाराशिव अंकुर शिशुगृहाला रोटरी क्लबने मदतीचा हात दिला आहे. धाराशिव रोटरी क्लबचे नवनिर्वाचित अध्यक्ष रणजीत रणदिवे आणि सचिव प्रदीप खामकर यांनी आपले दातृत्वाच्या भावनेने ही मदत केली .यावेळी 'अंकुर शिशुगृहात दोघांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी अध्यक्ष रणजीत रणदिवे म्हणाले, ''रोटरी क्लबच्या माध्यमातून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदतीचा हात पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न असेल. विशेषतः अनाथ व गरजू मुलांसाठी उपयुक्त उपक्रम हाती घेतले जातील.'' सचिव प्रदीप खामकर यांनीही आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले, ''आपल्याकडील संसाधने समाजासाठी वापरणे हेच रोटरीचे खरे ध्येय आहे.कार्यक्रमादरम्यान धाराशिव जिल्हा रोटरी क्लबने 'अंकुर शिशुगृह' संस्थेला आर्थिक मदत दिली, जी शिशुगृहातील मुलांच्या संगोपनासाठी उपयुक्त ठरणार आहे.या वेळी क्लबचे अध्यक्ष रणजीत रणदिवे, सचिव प्रदीप खामकर, अंकुर शिशुगृहाचे सदस्य फेरोज पल्ला, तसेच शिशुगृहाचे अधीक्षक ईश्वर राठोड उपस्थित होते. 'अंकुर शिशुगृह' ही धाराशिवमधील एक विशेष दत्तक संस्था असून, अनाथ व दुर्लक्षित बालकांच्या निवाऱ्याचे व पुनर्वसनाचे कार्य करत आहे. या संस्थेच्या सेवाकार्यात सामाजिक संस्था, विविध संघटना व नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन याप्रसंगी करण्यात आले.''या निरागस चेहऱ्यामागे असलेल्या वेदना समजून त्यांना जीवनाचा नवा आशय देणं हीच खरी समाजसेवा आहे. 'अंकुर'सारख्या संस्थांना सहकार्य करून आपणही या प्रयत्नाचा भाग व्हावं,'' असे आवाहन आयोजकांनी केले.

# दिनेश बागल यांची भाजप तुळजापूर ग्रामीण युवा मोर्चा तालुकाध्यक्षपदी नियुक्ती

**आरंभ मराठी | तुळजापूर**



पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पार्टीचे संघटन मजबूत करण्याच्या उद्देशाने, तुळजापूर तालुक्यातील युवा नेतृत्व म्हणून दिनेश बागल यांची भाजप युवा मोर्चा तालुकाध्यक्ष पदावर निवड करण्यात आली आहे. महादेव आण्णासाहेब जाधव (मंडळ अध्यक्ष, तुळजापूर ग्रामीण) यांनी अधिकृत पत्रकाद्वारे ही घोषणा केली. विविध राजकीय, सामाजिक कार्यांमधून सक्रिय सहभाग नोंदवणारे दिनेश बागल यांची ही निवड कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण करणारी ठरली आहे. दिनेश बागल यांनी पक्षवाढीसाठी कटिबद्ध राहून नवयुवकांमध्ये भाजपचे विचार पोहोचवण्याचे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली युवा मोर्चा अधिक सक्षम, संघटित व जोमदार कार्य करेल, असा विश्वास पक्ष पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

# जिजामाता नगर येथील महिला स्वच्छतागृहाची दुरवस्था

**आरंभ मराठी | तुळजापूर**




तुळजापूर शहरातील जिजामाता नगर येथील महिला स्वच्छतागृहाची दुरावस्था झाली असून याबाबत निवेदनाद्वारे दुरुस्तीची मागणी सामाजिक कार्यकर्ते बालाजी तट यांनी मुख्याधिकारी नगरपरिषद तुळजापूर यांच्याकडे केली आहे. याबाबत अधीक माहिती अशी की, जिजामाता नगर येथील महिला स्वच्छतागृहाची गेल्या चार ते पाच वर्षापासून स्वच्छता न झाल्याने बंद अवस्थेत आहे. यामुळे संपूर्ण परिसरात प्रचंड घाण तसेच दुर्गंधी व अस्वच्छता पसरली आहे यामुळे या भागातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. यामुळे महिलांना मोठ्या प्रमाणात त्रासाला समोरे जावे लागत असून याबाबत या स्वच्छतागृहाची दुरुस्ती करुन स्वच्छता करावी अशी मागणी बालाजी तट यांनी केली आहे.

# उमरगा जिल्हा परिषद हायस्कूल येथे माहेरची ओढ उपक्रमांतर्गत गरजू विद्यार्थीनींना मदत

**आरंभ मराठी | उमरगा**



उमरगा शहरातील जिल्हा परिषद हायस्कूल येथे माहेरची ओढ उपक्रमांतर्गत वैशाली कैलास आष्टे आणि विद्या दुष्यंत पाटील यांनी प्रशालेचे मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांच्याकडे आर्थिक मदत सुपुर्द केली. 'माहेरची ओढ' या उपक्रमाच्या संकल्पक सरिता उपासे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम सर्वत्र राबविण्यात येत आहे. प्रत्येक विवाहीत स्त्रीला आपल्या माहेर बद्दल एक प्रकारची ओढ असते. आपले माहेरातील घर, शेती, शेजारी, भावकी व एकूणच माहेरचे गाव याबद्दल आपुलकी असते. या आपुलकीलाच सकारात्मक आणि सक्रिय रूप देण्याची संकल्पना मांडली. या अंतर्गत प्रत्येक स्त्रीने आपल्या माहेरच्या शेतात एक फळाचे झाड लावावे जेणेकरून पुढील चार–पाच वर्षात त्याला फळ येईल. तसेच माहेरच्या गावातील शाळेतील गरजू विद्यार्थ्यीनीला शैक्षणिक साहित्य घेण्यासाठी मदत करणे तसेच आपल्या वाढदिवसाच्या दिवशी माहेरातील शाळेस एक पुस्तक भेट देणे असे या उपक्रमाचे स्वरूप आहे. सरिता उपासे यांनी ही संकल्पना आपल्या मैत्रीणीसमोर मांडली. त्याला उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळत आहे. या महिला स्वतः आपल्या मैत्रिणींना जास्तीत जास्त या उपक्रमात सहभागी करून घेत आहेत. आपल्या माहेरच्या मैत्रीणीशी संपर्क साधून या उपक्रमाचे स्वरूप समजून सांगत आहेत आणि ही एक प्रकारे साखळी वाढत चालली आहे. उमरगा तालुक्यासोबतच इतर तालुका आणि जिल्ह्यातही हा उपक्रम राबविला जात आहे. जि.प.प्रशालेत गरजू विद्यार्थीनींना शैक्षणिक साहित्यासाठी वैशाली कैलास आष्टे आणि विद्या दुष्यंत पाटील यांनी आर्थिक मदत मुख्याध्यापकांकडे सुपूर्द केली. याप्रसंगी साधन व्यक्ती अयोध्या चिगुरे, शशीकला राठोड, पार्वती माशाळकर, रमेश ममाळे, सहशिक्षक शिल्पा चंदनशिवे, गोविंद जाधव आदी उपस्थित होते.

### गावाशी भावनिक नाते निर्माण करणारा उपक्रम

माहेरची ओढ या उपक्रमांचे स्वरूप म्हणजे विवाहीत स्त्रिने आपल्या माहेरशी ऋणानुबंध वाढतील यासाठी प्रयत्न करणे. माहेरातील मंदिरातील बांधकामात कळस चढविण्याच्या कामात माहेरवाशिणी आर्थिक योगदान देत असतात. त्याप्रमाणेच दरवर्षी माहेरातील शेतात एक फळाचे झाड लावावे. केवळ सख्ख्या भावाच्या शेतातच नाहीतर कधी कोणी चुलत भावंडाच्या शेतातही झाड लावावे. तसेच माहेरातील गरजू विद्यार्थ्यीनींना शैक्षणिक साहित्यासाठी आर्थिक मदत करावी. तसेच वाढदिवसादिवशी एक पुस्तक शाळेला भेट द्यावे. या उपक्रमामुळे वृक्षारोपण आणि वृक्षसंगोपण होईल, मुलींच्या शिक्षणासाठी मदत होऊन महिला सबलीकरण होईल, तसेच वाचन संस्कृती वाढीस लागेल. या उपक्रमामुळे माहेरच्या माणसांशी, माहेरच्या गावाशी एक प्रकारे भावनिक नाते निर्माण होईल.

**सरिता उपासे**

# दिव्यांग, शेतकरी आणि उपेक्षित घटकांच्या न्याय्य मागण्यांसाठी सरकारकडे आवाज

## दिव्यांग संघटना प्रहारच्या वतीने जिल्ह्यातून सर्व तालुक्यात निवेदन सादर

**आरंभ मराठी | तुळजापूर**



प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली सुरु झालेल्या दिव्यांग क्रांती आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर धाराशिव जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधून प्रहारच्या कार्यकर्त्यांनी तहसील कार्यालयांमध्ये निवेदन सादर करत सरकारकडे दिव्यांग, शेतकरी व उपेक्षित घटकांच्या मागण्यांकडे तातडीने लक्ष देण्याची जोरदार मागणी केली. दिनांक ७ जुलैपासून सुरु असलेली ही जनजागृती पायदळ यात्रा सुमारे ३०० किमी अंतर पार करत असून, यामार्फत सरकारचे लक्ष समाजातील वंचित, दिव्यांग, महिला, युवक व शेतकरी वर्गाच्या प्रश्नांकडे वेधले जात आहे. निवेदनाद्वारे अनेक महत्त्वाच्या मागण्या मांडण्यात आल्या. त्यामध्ये दिव्यांगांसाठी किमान ६००० मासिक मानधन, स्वतंत्र घरकुल योजना, दिव्यांग भवन, शैक्षणिक आरक्षण, रोजगारसाधन, डिजिटल साधने, क्रीडा–शिक्षण क्षेत्रातील योजना, व ५% खासगी शिक्षण संस्थांमध्ये आरक्षण आदींचा समावेश आहे. शेतकऱ्यांसाठी अंतर्गत रोजगार, विशेष अनुदान पॅकेज, ५०% कर्जमाफी, व शेतकऱ्यांना घरकुलासाठी ५ लाख निधी मिळावा अशा ठोस मागण्या आहेत. त्याचबरोबर शहीद व माजी सैनिक, स्वातंत्र्यसैनिक वारसदारांसाठी सन्मान योजना व आर्थिक पुनर्वसनाच्या योजनाही सुचविण्यात आल्या आहेत. जर शासनाने या मागण्यांकडे दुर्लक्ष केले, तर २ ऑक्टोबर २०२५ रोजी राज्यभर तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा यावेळी देण्यात आला. यावेळी धाराशिव जिल्ह्यातील आठही तालुक्यातील प्रहार संघटनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या निवेदनामार्फत तहसीलदारांनी या मागण्या शासनाकडे पोहोचवून त्या तातडीने अंमलात आणाव्यात, अशी विनंती करण्यात आली. अन्यथा, प्रहार जनशक्ती पक्ष वंचितांच्या हक्कासाठी अधिक आक्रमक आंदोलन राबवेल, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.